**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या गुरुवार दिनांक ३०.१२.२०१० रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३४ वी बैठक गुरुवार दिनांक ३० डिसेंबर २०१० रोजी सकाळी ११.००वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारी लाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.सुभाष हजारे, भा.प्र.से. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| २. | मा.श्री.प्र.ल.पाठक | उपसचिव, महा.शासन |
| ३. | मा.डॉ.श्री.ल.पुलकुंडवार | अवर सचिव, महा.शासन |
| ४. | मा.श्री.नंदकुमार काळे | सदस्य |
| ५. | मा.श्री.कमरुद्दिन मर्चंट | सदस्य |
| ६. | मा.व्ही.जी.नायर | सदस्य |
| ७. | मा.श्री.किसन बा.जाधव | सदस्य |
| ८. | मा. श्री.तारिक फारुकी | सदस्य |
| ९. | मा.श्रीमती.सुरेखा पाटील | सदस्या |
| १०. | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ११. | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १२. | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १३. | मा.श्रीमती.उल्का पाटकर | सदस्या |
| १४. | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १५. | मा श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| १६. | कार्यकारी अभियंता/इमारत प्रस्ताव शहर महापालिका | सदस्य |
| १७. | श्री.पी.पी.महिषी, निवासी कार्यकारी अभियंता, | सचिव |
| १८. | श्री.ओ.बी.साहू | सहमुख्य अधिकारी |

सचिव, श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १३४ व्या बैठकीत सर्व उपस्थित सन्मानीय सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्माननीय सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे सर्व सन्मा.सदस्यांना विनंती केली की, बोलताना माईक चालू करावा म्हणजे कार्यवृत्तांत करतांना अडचणी येणार नाहीत व  मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक -१३४.१**

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृष्ठ क्र.१ ते ११ वर सादर करण्यांत आले असून १३३ व्या बैठकीचा कार्यपालन अहवाल पृष्ठ क्र.५३ वर सादर केल्याचे सचिव श्री.महिषी यांनी सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी मा.सभापतींकडे अशी विचारणा केली की, श्रीमती.संध्या लांगडे यांना निलंबित केले आहे, त्याबद्दल सभागृहास माहिती द्यावी.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, २००३ मध्ये मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार एका पुनर्रचित इमारतीमधील दोन गाळे राखीव ठेवण्याचे होते. सन २००६-०७ च्या दरम्यान सदर दोन्ही गाळे बोगस कागदपत्रांच्या आधारे वितरीत झाल्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला. त्या वेळेस दोन्ही गाळयांचे सदर बोगस वितरण रद्द करण्यांत आले व ते गाळे मंडळातर्फे ताब्यांत घेण्यांत आले. त्यापैकी एक गाळा पुन्हा २०१० मध्ये वितरीत करण्यांत आला. त्यामुळे दुस-यांदा मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाला. सदर न्यायालयाच्या आदेशाचा अवमान मा.उच्च न्यायालयाने गंभीरपणे घेतला आहे. हा अवमान प्राथमिकरित्या ज्या दोघा अधिकारी/कर्मचा-यांमुळे झाला, त्यापैकी एक जे २००७ साली मिळकत व्यवस्थापक होते, व ज्यांनी त्यावेळी याची योग्य त्या अभिलेखात नोंद घेणे आवश्यक होते, ती नोंद त्यांनी घेतली नाही, म्हणून त्यांना निलंबित करण्यांत आले. तसेच सदर गाळयापैकी एका गाळयाचे वितरण करुन श्रीमती.लांडगे यांनी चूक करुन मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा अवमान केला. मूळ नस्ती न शोधता, प्रकरणाचा विचार न करता एका साध्या अर्जावर उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांची मान्यता न घेता व मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात न घेता श्रीमती.लांडगे यांनी यापैकी एका गाळयाचे वितरण करुन पुन्हा न्यायालयाचा अवमान केल्याने व चुकीचे वितरण केल्याने त्यांना निलंबित करण्यांत आलेले आहे. प्रकरणी पुढची चौकशी सुरु आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी नवीन प्रकारची व्हेकेशन नोटीस अंतिम करण्याचे काय झाले, अशी विचारणा केली असता, उपमुख्य अभियंता,परिमंडळ-१ यांनी खुलासा केली की, सदर प्रकरणी अभ्यास गट नेमला असून, या अभ्यास गटामध्ये उपमुख्य अभियंता,

परिमंडळ-१,श्री.ढोले, अध्यक्ष अभ्यासगट , श्री.गोटे, उपमुख्य अधिकारी (सं.गा.), सचिव व कार्यकारी अभियंता ,सर्वश्री.शेठ, सक्सेना, यांचा समावेश आहे. या विषयावर २ चर्चा सत्र झालेले आहेत. त्यावर सन्मा.सदस्य श्री.हेमराज यांनी ही व्हेकेशन नोटीस अंतिम करण्याची कार्यवाही कधी पुरी करण्यांत येणार आहे, अशी विचारणा करण्यांत आली. त्यावर श्री.ढोले यांनी अंदाजे १५ दिवसांत मंडळाकडे अहवाल सादर होईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की, व्हेकेशन नोटीसमध्ये त्यांनीसुध्दा कांही सुधारणा सुचविल्या होत्या. त्यावर सचिव यांनी मा.सदस्यांनी सुचविलेलया सुधारणाही त्या नस्तीमध्ये आहेत. मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, अशीच एक नस्ती विधी सल्लागार/प्राधिकरण यांचेकडे गेली होती. त्यांत त्यांनी देखील या संदर्भात कांही सुधारणा सुचविल्या आहेत. आलेल्या सर्व सुधारणांचा समावेश करुन, अभ्यास गट अहवाल देईल व तद्नंतर सर्वंकश विचार करुन सदर बाब अंतिम करण्यांत येईल.

मा.सदस्य,श्री.किसन जाधव यांनी पृष्ठ क्र.२ वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे धारावीच्या संदर्भात आपण माहिती दिलेली आहे. यास जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांवर काय कार्यवाही करण्यांत आली आहे, आता महिना उलटून गेलेला आहे. त्यावर मा.मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची बाब प्राधिकरणाने मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण यांचेकडे सोपविलेली असून, त्यांचा अहवाल आल्यानंतर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी परिच्छेद ३ मध्ये ना हरकत प्रमाणपत्रधारक विकासकाकडून दुरुस्ती खर्चापोटी किती रक्कम वसूल झालेली आहे, त्याबाबत विचारणा केली असता, सचिव यांनी सदर माहिती पृष्ठ ५३ वर कार्यपालन अहवालात सादर केली आहे, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी म्हटले की, ना हरकत प्रमाणपत्र प्रस्तावाकरिता भाडेकरु/रहिवाश्यांची यादी संबंधित कार्यकारी अभियंता /उपमुख्य अभियंता यांचेकडून जबाबदारी पूर्वक केली जाते. त्यावर सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल देखील म्हणाले की, यावर मागेही चर्चा केली होती, कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांनी यादी प्रमाणित

केल्यानंतर यादीवरील आक्षेपाबाबत १ ले अपिल मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे व २ रे अपिल राज्य शासनाकडे करण्याची तरतूद असल्यामुळे यादी प्रमाणित केल्यानंतर आक्षेपासाठी १ महिन्याचा कालावधी दिलेला असला तरी त्याची वाट न पहाता प्रस्ताव मंडळापुढे सादर का करण्यांत येत नाही, अशी विचारणा त्यांनी व इतर सदस्यांकडून करण्यांत आली.

सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मंडळासमोर असा प्रश्न उपस्थित केला की, ज्याकरिता मंडळाची स्थापना झाली, मुख्य अधिकारी/दुवपु आल्यानंतर कामामध्ये गती आली परंतु वॉर्डचे उपमुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता,उप अभियंता यांच्यावर आपण जी भाडेकरु/रहिवाश्यांची यादी प्रमाणित करण्याची जबाबदारी टाकली, त्यानंतर आपणाकडे काही तक्रारी आल्या आहेत का ? शासन निर्णयामध्ये १ महिन्याचा कालावधी ठेवला असला तरी त्या कालावधीत प्रस्ताव मान्य करु नये, अशी तरतूद नाही. सदर मुद्यावर मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी शासन निर्णयामधील परिच्छेद ६ अन्वये उपमुख्य अभियंता,यांनी भाडेकरु/रहिवाश्यांची पात्रता यादी भाडेकरु/रहिवाशी/विकासकांना पाठविण्यांत आल्यानंतर पात्र व अपात्र ठरलेल्या भाडेकरु/रहिवाश्यांनी पात्र/अपात्रतेसंबंधी कांही आक्षेप किंवा तक्रारी असतील तर त्यांनी त्याबाबतचे आक्षेप मुख्य अधिकारी यांच्याकडे ३० दिवसांत सादर करतील व तक्रार अर्जावर मुख्य अधिकारी यांना आवश्यक वाटल्यास स्वत:हून त्यावर ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी पात्रता यादीचे पुनर्निरिक्षण करतील, अशी तरतूद आहे.

शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ अन्वये प्रस्तावास ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर समाधान न झाल्यास, मंजूर यादीतील व्यथित अर्जदार/रहिवाशी/विकासक उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांचेकडे ४५ दिवसांत १ ले अपिल दाखल करु शकतात.

परिच्छेद क्र.८ अन्वये उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपिलावर पारित केलेल्या आदेशामुळे समाधान न झाल्यास भाडेकरु/रहिवाशी अथवा विकासक आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांत शासनाकडे अपिल दाखल करु शकतात, असे निदर्शनास आणून दिले. सदर अपिलात निर्णयामुळे भाडेकरुंच्या यादीत फेरबदल होऊ शकतो. त्याच धर्तीवर यादी प्रमाणित केल्यानंतर तक्रार दाखल करण्याच्या १ महिन्याच्या कालावधीतही ना हरकत

प्रमाणपत्राचे प्रस्तावावर निर्णय घेण्यास अडचण नाही. उपरोक्त उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांवर चर्चा होऊन एकमताने ठराव करण्यांत आला की,

**ठराव क्रमांक ११४८**

"शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६,७,व ८ मधील तरतुदीस अधीन राहून भाडेकरु/रहिवाश्यांची यादी प्रमाणित केल्यानंतर मुख्य अधिकारी यांच्याकडे आक्षेप सादर करण्याचे ३० दिवसांच्या कालावधीकरिता न थांबता प्रस्ताव मंडळाकडे मान्यतेस्तव सादर करुन, मंडळाची मान्यता घेण्यांत यावी. तदनंतर प्राप्त झालेल्या तक्रारी व आक्षेपाच्या अनुषंगाने व मुख्य अधिकारी यांना आवश्यक वाटल्यास स्वत:हून त्यावर ना हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यापूर्वी पात्रता यादीचे पुनर्निरिक्षण करुन मान्यतेमध्ये त्याप्रमाणे सुधारणा करावी. मंडळाकडे सादर केलेल्या प्रस्तावात ना हरकत प्रमाणपत्र देताना कांही बदल मुख्य अधिकारी यांनी केले तर, त्याबाबतची माहिती मंडळाच्या पुढील बैठकीत देण्यांत यावी. वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी सर्व अधिकार मा.मुख्य अधिकारी यांना या ठरावाद्वारे मंडळ प्रदान करीत आहे. वरील कार्यवाहीमुळे ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये वेळेचा अपव्यय न होता, उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु/रहिवाश्यांना ना हरकत प्रमाणपत्र सत्वर मिळून दिलासा मिळेल. सदर निर्णय /ठराव शासनास अवगत करुन देण्यांत यावा, असेही ठरले."

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी विचारले की, मंगलवाडी येथील इमारतीं करिता खिडक्यांच्या डिझाईनबाबत काय झाले, यावर मुख्य अधिकारी/दुवपु यांनी असे सांगितले की, सदर बाबतीत प्रस्ताव मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यांत आला आहे.

मा.सदस्य श्री.बांदिवडेकर यांनी असे निदर्शनास आणले की, कांही विभागातील पुनर्रचित इमारतीमध्ये भाडेकरु/रहिवाश्यांनी बँकेत भाडे भरु नये, असे फलक लावण्यांत आले होते. त्याबाबत विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी/दुवपु यांनी असे फलक परेल विभागात लावण्यांत आल्याचे निदर्शनास आणून देण्यांत आले होते. सदर बाबतीत कार्यकारी अभियंता, श्री.शेठ यांना स्थानिक लोकप्रतिनिधींना भेटून मंडळातर्फे भाडे बँकेत भरण्याबाबत भाडेकरु/ रहिवाश्यांना कळविण्याबाबत विनंती करण्यांत आली आहे. तसेच सदर निर्णयाची माहिती सर्व भाडेकरुंना देण्याच्या सूचना देण्यांत आल्या आहेत. जर कोणी भाडेकरु/

रहिवाश्यांनी बँकेत भाडे भरले नाही तर, थकबाकी वसुलीसाठी मात्र मंडळाचे भाडेवसुलीकार यांना भाडे वसुलीसाठी जावे लागणार आहे. तथापि अशी थकबाकी दंडासह वसूल करण्यांत येईल, असेही मुख्य अधिकारी यांनी सांगितले. सर्व भाडेकरु/रहिवाश्यांनी दरमहा भाडे बँकेतच भरणे आवश्यक आहे.

**बाब क्रमांक - १३४.२(१)**

**पुनर्विकास-**
मुंबई बेटावरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१.भूकर पहाणी क्र.१६८७, भायखळा विभाग, इ.क्र.२-४, घेलाभाई स्ट्रीट, मार्ग क्र.१.२, मदनपुरा, मुंबई ४०० ००८येथील **'ईसा सुमार चाळ**
२.भूकर पहाणी क्र.७३५-अे, इमारत क्र.४१ खान अब्दुल गफ्फार खान रोड, वरळी, मुंबई १८ येथील **'शांडिल्य व्हिला ' 'ग/दक्षिण'**
३.भूकर पहाणी क्र.२२२/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.२७२, दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.१२ व १०, देवधर रोड, मांटुंगा, मुंबई १९ येथील **'बाळकृष्ण भवन' 'फ/उत्तर'**
४.भूकर पहाणी क्र.४१२७ व ४१२८, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-७२६२ आणि सी-७२६४ व ७९१६ (२) इ.क्र.३९-४१ व ३३, बारा इमाम मार्ग, मुंबई ४०० ०२३ येथील मालमत्ता **सी-१ विभाग**
५. भूकर पहाणी क्र.९८/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.१३६ सुपारी बाग इस्टेट, इमारत क्र.१३, उपकर क्र.फ/द/५६७ (२बी), परमार गुरुजी मार्ग, परेल, मुंबई १२, **'झवेरी'** बिल्डींग **'फ/दक्षिण'.**
**६.**भूकर पहाणी क्र.१००७-टी.पी.एस.-४ माहिम विभाग, इमारत क्र.७४-७४-ई, सयानी रोड व इ.क्र.३०-३०-ए, नार्दुल्ला टँक रोड, उपकर क्र.गद/३०८६-८७ (१), प्रभादेवी, मुंबई २५ **'हाजी इस्माईल गनी चाळ '**
७.भूकर पहाणी क्र.१९७८ भायखळा विभाग उपकर क्र.ई-४४२८ (३) इ.क्र.२९-३१, एम.ए.रोड, मुंबई येथील **'गवळी चाळ ' ई-२ विभाग.**
**८.**भूकर पहाणी क्र.१९८७ भायखळा विभाग इ.क्र.५८६-५९८, बी.जे.मार्ग. आणि ११-१५ एम.ए.रोड, मुंबई.
९. भूकर पहाणी क्र.८२८-ए/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१५०-ए, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.८, उपकर क्र.फउ/७३०५, हिंदु कॉलनी, रोड क्र.६, दादर (पूर्व), मुंबई १४, **'वासुदेव सदन' 'फ/उत्तर'**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१३ ते ४७ वर सादर करण्यांत आलेले आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

**ठराव क्रमांक ११४९**

मुंबई बेटावरील खालील ९ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यांत आली.

१.भूकर पहाणी क्र.१६८७, भायखळा विभाग, इ.क्र.२-४, घेलाभाई स्ट्रीट, मार्ग क्र.१.२, मदनपुरा, मुंबई ४०० ००८येथील **'ईसा सुमार चाळ**

२.भूकर पहाणी क्र.७३५-अे, इमारत क्र.४१ खान अब्दुल गफ्फार खान रोड, वरळी, मुंबई १८ येथील **'शांडिल्य व्हिला ' 'ग/दक्षिण'**

३.भूकर पहाणी क्र.२२२/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.२७२, दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.१२ व १०, देवधर रोड, मांटुंगा, मुंबई १९ येथील **'बाळकृष्ण भवन' 'फ/उत्तर'**

४.भूकर पहाणी क्र.४१२७ व ४१२८, भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-७२६२ आणि सी-७२६४ व ७९१६ (२) इ.क्र.३९-४१ व ३३, बारा इमाम मार्ग, मुंबई ४०० ०२३ येथील मालमत्ता **सी-१ विभाग**

५. भूकर पहाणी क्र.९८/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.१३६ सुपारी बाग इस्टेट, इमारत क्र.१३, उपकर क्र.फ/द/५६७ (२बी), परमार गुरुजी मार्ग, परेल, मुंबई १२, **'झवेरी'** बिल्डींग **'फ/दक्षिण'**

**६.**भूकर पहाणी क्र.१००७-टी.पी.एस.-४ माहिम विभाग, इमारत क्र.७४-७४-ई, सयानी रोड व इ.क्र.३०-३०-ए, नार्दुल्ला टँक रोड, उपकर क्र.गद/३०८६-८७ (१), प्रभादेवी, मुंबई २५ **'हाजी इस्माईल गनी चाळ '**

७.भूकर पहाणी क्र.१९७८ भायखळा विभाग उपकर क्र.ई-४४२८ (३) इ.क्र.२९-३१, एम.ए.रोड, मुंबई येथील **'गवळी चाळ ' ई-२ विभाग.**

**८.**भूकर पहाणी क्र.१९८७ भायखळा विभाग इ.क्र.५८६-५९८, बी.जे.मार्ग. आणि ११-१५ एम.ए.रोड, मुंबई.

९. भूकर पहाणी क्र.८२८-ए/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.१५०-ए, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.८, उपकर क्र.फउ/७३०५, हिंदु कॉलनी, रोड क्र.६, दादर (पूर्व), मुंबई १४, **'वासुदेव सदन' 'फ/उत्तर'**

**बाब क्रमांक - १३४.३**

**विषय:-**डी-१ विभागातील चार उपकरप्राप्त इमारतींना वेगवेगळया करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.४९ ते ५१ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.

**ठराव क्रमांक -११५०**

इमारत क्रमांक २१-२१ (ए), २३-२३(बी), २५,आणि २७ डी.डी.साठे मार्ग या इमारतींचे खालीलप्रमाणे वेगवेगळया इमारती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्याची अनुमती देण्यांत आली.

१].२१-२१(ए) डी.डी.साठे मार्ग,उपकर प्राप्त इ.क्र.३३३(१)(२),

२] २३-२३ (बी), डी.डी.साठे मार्ग,उपकर प्राप्त इ.क्र.३३१,

३] २५, डी.डी.साठे मार्ग,उपकर प्राप्त इ.क्र.३३०,

४] २७, डी.डी.साठे मार्ग,उपकर प्राप्त इ.क्र.३३८,

मूळ कार्यसूचीवरील विषय संपल्यानंतर आयत्यावेळचे विषय मंडळासमोर मांडण्यासाठी सचिवांनी मा.सभापती यांची परवानगी मागितली. परवानगी दिल्यानंतर विषय मंडळाच्या बैठकीत ठेवण्यांत आले.

## आयत्यावेळचे विषयः-

## अनुक्रमणिका-१

**बाब क्रमांक - १३४.४**

**विषयः-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.२९.११.२०१० रोजी झालेल्या १३३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील विषयाबाबत **कार्यपालन अहवाल.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५३ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सदर अहवालाबाबत मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सदर अहवाल मूळ कार्यसूचीसोबत पाठविल्यास योग्य राहील, असे सुचविले. त्यावर सचिव यांनी त्याची नोंद घेतली.

**बाब क्रमांक - १३४.५**

**विषयः-**पुनर्रचित गाळे, संक्रमण शिबिर गाळयांचे भाडेकरुने वर्षभराचे भाडे आगाऊ एक रकमी भरल्यास सूट देणेबाबत.

यापूर्वी मंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने एकरकमी भाडे भरल्यास सूट देण्याबाबत विस्तृत टिप्पणी प्रस्ताव पृष्ठ क्र.५५ ते ५७ वर सादर करण्यांत आलेली आहे.

सदर बाबीवर चर्चा करतांना मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे सूचित केले की, प्रस्तावित केलेली २ टक्के सूट ही कमी असून, ती कमीतकमी ३ टक्के करावी व त्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी पाठींबा दर्शविला.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावात २ टक्के सूट ऐवजी ३ टक्के सूट देण्याबाबत एकमताने मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५१**

भाडेकरुंनी/रहिवाश्यांनी १ वर्षाचे संपूर्ण भाडे एप्रिल महिन्यांत आगाऊ जमा केल्यास त्यांना प्रत्यक्ष भाडे रकमेवर २ टक्के ऐवजी ३ टक्के दराने सवलत देण्याचा प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. प्रस्ताव धोरणात्मक व आर्थिक स्वरुपाचा असल्याने प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव पाठविण्यास मान्यता देण्यांत आली.

**बाब क्रमांक - १३४.६(१)**.

**विषय:-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
१.परिमंडळ-१ मधील (अे,सी-१,सी-२,सी-३) ३१ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५९ ते ७१ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सचिव यांनी दुरुस्ती परिमंडळ-१ मधील अ-विभागाचे विवरण पत्रातील पृष्ठ क्र.६३ वर सुधारणा पुढीलप्रमाणे वाचून दाखविली.

अनु.क्र.२ येथे इमारत क्र.५० - ५९ ऐवजी ५०-५६ शहिद भगतसिंग मार्ग असे वाचावे. सदर बदलास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५२**

मुंबई शहर व बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट 'अ'व परिशिष्ट 'ब' नुसार एकूण **३१** उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी **रु.३,९३,९८,२४१/- (रुपये तीन कोटी, त्र्याण्णव लक्ष, अठ्ठयाण्णव हजार, दोनशे एकेचाळीस फक्त )**

एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम **रु. २,६८,८०,१६३/- (रुपये दोन कोटी, अडुसष्ट लक्ष, ऐंशी हजार, एकशे त्रेसष्ट फक्त** ) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक - १३४.६(२)**

**विषयः-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
१.परिमंडळ-१ मधील (अे,सी-१,सी-२,सी-३) २१ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७३ ते ८१ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५३**

मुंबई शहर व बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट 'अ' नुसार एकूण **२१** उपकर पात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी **रु.४,६१,४५,२००/- (रुपये चार कोटी, एकसष्ट लक्ष, पंचेचाळीस हजार, दोनशे फक्त** ) एवढया रकमेच्या अंदाज पत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम **रु. २,२८,८८,१२६/- (रुपये दोन कोटी, अठ्ठावीस लक्ष, अठ्ठयाऐंशी हजार, एकशे सव्वीस फक्त** ) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक - १३४.६(३)**

**विषयः-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
१.परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,डी-३) ११ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८३ ते ९१ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५४**

मुंबई शहर व बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट 'अ' नुसार एकूण **११** उपकर पात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी **रु.२,६६,९३,९४४.२५/- (रुपये दोन कोटी, सहासष्ट लक्ष, त्र्याण्णव हजार, नऊशे चव्वेचाळीस पैसे पंचवीस फक्त )** एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम **रु.१,७१,५३,४१७ /- (रुपये एक कोटी, एकाहत्तर लक्ष, त्रेप्पन्न हजार, चारशे सतरा फक्त )** इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक - १३४.६(४)**

**विषय:-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
१.परिमंडळ-३ मधील (बी,ई-१,ई-२) १३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.९३ ते १०१ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५५**

मुंबई शहर व बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट 'अ' नुसार एकूण **१३** उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी **रु.१,९३,९४,४१८/- (रुपये एक कोटी, त्र्याण्णव लक्ष, चौऱ्याण्णव हजार, चारशे अठरा फक्त )** एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम **रु.१,३७,३१,०८३/- (रुपये एक कोटी, सदतीस लक्ष, एकतीस हजार, त्र्याऐंशी फक्त )** इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक - १३४.६(५)**

**विषयः-**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.
१.परिमंडळ-३ मधील (बी,ई-१,ई-२) १६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१०३ ते ११३ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५६**

मुंबई शहर व बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट 'अ' नुसार एकूण **१६** उपकर पात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी **रु.२,८०,९१,८८९/- (रुपये दोन कोटी, ऐंशी लक्ष, एक्याण्णव हजार, आठशे एकोणनव्वद फक्त** ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम **रु.१,५७,९४,५४३/- (रुपये एक कोटी, सत्तावन्न लक्ष, चौऱ्याण्णव हजार, पाचशे त्रेचाळीस फक्त** ) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

तद्नंतर सचिव यांनी आयत्या वेळी ठेवलेले विषय संपल्याचे जाहीर केल. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.किसन जाधव श्री.हेमराज शहा यांनी कांही पुनर्विकासाचे प्रस्ताव मूळ विषय सूची पाठविल्यानंतर प्रशासनाकडे आले होते. ते बैठकीत का सादर करण्यांत आले नाहीत, अशी विचारणा केली असता, सचिव यांनी सांगितले की, मागील १३३ व्या बैठकीत सन्मा.सदस्यांनी ना हरकत प्रमाणपत्र प्रस्ताव आयत्या वेळच्या विषयामध्ये घेऊ नये असे सुचविलेले असल्याने, ४ पुनर्विकासाचे प्रस्ताव छाननी करुन, तयार असले तरी मंडळापुढे सादर करण्यांत आलेले नाही. त्यावर मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी असे मत व्यक्त केले की, मागच्या बैठकीत चर्चेच्या वेळी ना हरकत प्रमाणपत्रांचा विषय निघाला होता, तेव्हा शासनाच्या दि.१६.८.२०१० च्या शासन निर्णयामुळे छाननी, आक्षेप व अपिल या प्रक्रियेमुळे आधीच ना हरकत प्रमाणपत्र प्रस्ताव सादर करण्यास विलंब होत असल्याचे व ना हरकत प्रमाणपत्राचे प्रस्ताव

आयत्या वेळच्या विषयात चर्चेला न घेतल्यास ना हरकत प्रमाणपत्र देण्यामध्ये आणखी विलंब लागेल. त्यामुळे जुन्या इमारतीमधील भाडेकरु/रहिवाश्यांवर अन्याय होईल. तरी पूर्वीप्रमाणेच ना हरकत प्रमाणपत्राची तयार असलेली प्रकरणे आयत्या वेळच्या विषयात घेण्यात यावीत. त्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी पाठींबा दर्शविला. त्यानुसार आयत्या वेळच्या विषयाची अनुक्रमणिका क्रमांक २ वितरीत करण्यांत आली.

**<u>आयत्यावेळेचे विषय (अनुक्रमणिका-२ )</u>**

**बाब क्रमांक - १३४.२(१)**

**पुनर्विकास-**
मुंबई बेटावरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१०. भूकर पहाणी क्रमांक ५६-बी/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.५०, लालबाग इस्टेट, इमारत क्र.१७२-बी, उपकर क्र.फद, ५९६ (१), गणेश गल्ली, लालबाग, मुंबई १२, '**वरगंटे सदन**'
११. भूकर पहाणी क्रमांक १३/१८४०, उपकर क्र.ई-४३६७-६८, ई-४३६९, ई-४३७०, इमारत क्र.७९०-ए-७९०-ब, बी.जे.मार्ग, मुंबई '**दंडुकिया मॅन्शन**'
१२. भूकर पहाणी क्रमांक २२९६,१/२२९६,भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४५४५-४५४६(१-२) व ४५४७, सी-४५४४ (१-२) व सी-४५५० इ.क्र.२६ए, ६-८बी व २०-२४, भास्कर लेन, मुंबई येथील '**दामोदर भवन**', 'गौशाला बिल्डींग ' 'मावळास चाळ '
१३. भूकर पहाणी क्रमांक ४८६, गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-८९४ (१-२) इ.क्र.१०४-१०६-११०, खाडिलकर रोड व २३ सदाशिव लेन, गिरगांव, मुंबई येथील '**बोहरा बिल्डींग**',

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.११५ ते १३१ वर सादर करण्यांत आलेले आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

**ठराव क्रमांक ११५७**

मुंबई बेटावरील खालील ४ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यांत आली.

१०. भूकर पहाणी क्रमांक ५६-बी/७४, परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.५०, लालबाग इस्टेट, इमारत क्र.१७२-बी, उपकर क्र.फद, ५९६ (१), गणेश गल्ली, लालबाग, मुंबई १२, **'वरगंटे सदन'**

११. भूकर पहाणी क्रमांक १३/१८४०, उपकर क्र.ई-४३६७-६८, ई-४३६९, ई-४३७०, इमारत क्र.७९०-ए-७९०-ब, बी.जे.मार्ग, मुंबई **'दंडुकिया मॅन्शन'**

१२. भूकर पहाणी क्रमांक २२९६,१/२२९६,भुलेश्वर विभाग, उपकर क्र.सी-४५४५-४५४६(१-२) व ४५४७, सी-४५४४ (१-२) व सी-४५५० इ.क्र.२६ए, ६-८बी व २०-२४, भास्कर लेन, मुंबई येथील **'दामोदर भवन'**, 'गौशाला बिल्डींग ' 'मावळास चाळ '

१३. भूकर पहाणी क्रमांक ४८६, गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-८९४ (१-२) इ.क्र.१०४-१०६-११०, खाडिलकर रोड व २३ सदाशिव लेन, गिरगांव, मुंबई येथील **'बोहरा बिल्डींग'**,

**बाब क्रमांक १३४.७(१)**

विषयः-कोहिनूर मिल चाळ क्र.१०, महात्मा ज्योतिबा मार्ग, दादर-पूर्व या उपकरप्राप्त इमारतींचा ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) अंतर्गत दुरुस्ती करणेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१३३ वर सादर करण्यांत आलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११५८**

सदर इमारतीची दुरुस्ती मंडळामार्फत न करता 'ना हरकत प्रमाणपत्र [परताव्यासह ]' मार्फत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत आली.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ